# झाडी-गोडी

गोष्ट - केतकी घाटे

माझं नाव टेटू. काही लोक मला टिंटुकसुद्धा म्हणतात. तू आजूबाजूला आंबा, अशोक हे वृक्ष बघितले असतील. मी तितका सगळीकडे दिसत नाही. माझी गंमत म्हणजे मी भर पावसाळ्यात, सगळे झोपलेले असतात तेव्हा रात्री फुलतो!



माझी फुलं चांगली मोठ्ठी असतात. एका हातात एकच मावेल एवढं मोठं फूल! छान तांबड्या-गुलाबी रंगाचं आणि तुतारीच्या आकाराचं. म्हणूनच मला इंग्रजीत **Indian trumpet tree** म्हणजे भारतीय तुतारी म्हणतात.

रात्री माझ्या फुलातला रस खायला कोण बरं येत असेल? रात्री कुठले प्राणी, पक्षी त्यांच्या घरातून बाहेर पडतात? विचार कर... रात्री बाहेर पडून खाऊ शोधणाऱ्या प्राण्यांना निशाचर म्हणतात. तर माझा मकरंद चाखायला चक्क वटवाघळे येतात.



माझी फळंही मोठी गमतीदार असतात! हत्तीच्या सुळ्यांसारखी! हे लांबच लांब. जवळ-जवळ दोन ते अडीच फूट. त्यामुळे माझं अजून एक नाव आहे 'हस्तिदंतफल'.





एकदा काही मुलांना एका टेटूच्या झाडावर लटकलेली फळं बघून वाटलं की तलवारी झाडावर लटकल्या आहेत. मुलांनी माझं अजून एक नाव ठेवलं -
'तलवारीचं झाड'.



माझ्या फळांच्या आत शेकडो बिया असतात. माझ्या बियांना पंख असतात. काही दिवसांनी फळ फुटतं. मग माझ्या नाजूक बियांचा जणू पाऊसच जमिनीवर पडतो. काही बिया वाऱ्यामुळे दूर उडून जाऊन दूरच्या जमिनीवर पडतात. मग पुढे त्यांचं काय होत असेल बरं?

माझ्या बिया अशा असतात





टेटूची फळं छोटी असताना, हिरवी आणि कच्ची असतात. त्याची काही गावात भाजी करून खातात. ही भाजी चविष्ट आणि पौष्टिक असते.



टेटूची मुळे, पाने, कोवळी फळे, बिया औषधात वापरतात. घोड्याला किंवा बैलाला जखम झाली तर त्याच्या सालीची पूड करून हळदीमध्ये मिसळून जखमेवर लावतात. त्याने जखम बरी होते.

आपण बी लावली की हा टिंटूक नक्की उगवू शकतो. किंवा त्याचं रोप आणून आपण आपल्या अंगणात लावू शकतो.



आपल्या आजूबाजूला टेटू कुठे आहे ते शोध. कुणाला बरं विचारशील? टेटू शिवाय अजून कोणती झाडं रात्री फुलतात शोध पाहू. पुढच्या उन्हाळ्यात टेटूची शेंग मिळव आणि त्यातल्या बिया मोज. लक्षात ठेवशील ना?